**D**

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**बी. ए. – (विशारद) सामाजिकशास्त्रे/ योग**

**परीक्षा : मे – २०१६**

**प्रथम सत्र**

**विषय:– व्यावहारिक मराठी (BAM- 101)**

**दिनांक :** २४/०५/२०१६ **गुण :** ६० **वेळ :** स. १०.०० ते. दु. १२.३०

**सूचना :** १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३. उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

प्र.१. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.** (२०)

१. नको ती कारकुनी
२. मला आवडलेले पुस्तक
३. निसर्गाच्या सान्निध्यातील एक दिवस
४. स्त्री शिक्षण – एक सामाजिक गरज
५. इंटरनेटचा वापर : योग्य की अयोग्य

प्र.२.अ) **खालीलपैकी एका विषयावर पत्रलेखन करा.** (१०)

१. 'भाजी मंडईची ' सोय व्हावी यासाठी महापालिकेला विनंती अर्ज लिहा.
२. घराजवळील परिसरात डेंग्यूच्या डासांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे परिसराची स्वच्छता व्हावी, त्या संदर्भातील तक्रारीचे पत्र महापालिकेच्या आरोग्य विभागाला पाठवा.
३. तुम्ही एखाद्या कॉलेजमधून १२ वी (एच.एस.सी.) ची परीक्षा उत्तीर्ण झाला आहात त्या कॉलेजमधून टी.सी. मिळणेबाबत अर्ज लिहा.

ब) **इतिवृत्ताचा नमुना तयार करा. (कोणत्याही एक)** (१०)

१. भारतीय सनातन संस्थेच्या कार्यकारिणीची 'सिंहस्थ पर्वणी काळातील स्वयंसेवकांचा सहभाग' या विषयावर सभा झाली – त्याचे इतिवृत्त लिहा.

**किंवा**

२. 'मनोहर हौसिंग सोसायटी,' पुणे या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त तयार करा.

प्र.३. **आकाशवाणी या माध्यमासाठी जाहिरातींचे लेखन करा. (कोणत्याही एक)** (१०)

१. नवीन गृहनिर्माण संस्थेची जाहिरात –

**किंवा**

२. आयुर्वेदिक औषधे उत्पादन करणाऱ्या कंपनीची जाहिरात.

प्र.४. **खालील उताऱ्याचा सारांश लिहून शीर्षक द्या.** (१०)

भारतातील सामाजिक परिस्थितीत दोन्ही तत्वांचा अभाव आहे. हे मान्य करुनच आपण सामाजिक लोकशाही निर्माण करण्यास सुरुवात केली पाहिजे. या दोन गोष्टींपैकी एक गोष्ट म्हणजे समता. सामाजिक बाबतीत पाहावयाचे तर आपल्या भारतातील समाजरचना चढती भाजणी व उतरती भाजणीच्या तत्त्वावर उभारलेली असल्यामुळे काही जातींना उच्च दर्जा देण्यात आला आहे. आर्थिक

बाबतीत पहावयाचे तर भारतातील समाजात काही लोकांच्या घरी गजांतलक्ष्मी वावरत आहे, तर बहुसंख्य लोकांच्या घरात अठरा विश्वे दारिद्रय नांदत आहे. अशा परस्परविरुध्द स्वरूपाच्या घटनांनी भरगच्च भरलेल्या आपल्या नव्या राष्ट्रीय जीवनास आपण २६ जानेवारी १९५० ला सुरुवात करणार आहोत. या दिवसापासून राजकीय बाबतीत आपणाला समता मिळणार आहे, पण सामाजिक आणि आर्थिक बाबतीत आपणामध्ये असमता राहणार आहे. एक माणसाला एका मताचा अधिकार आणि एका मताची किंमत या तत्त्वाची जाणीव आपणाला राजकीय बाबतीत होणार आहे. सामाजिक व आर्थिक बाबतीत आपल्या विशिष्ट सामाजिक व आर्थिक रचनेमुळे आपण उपरिनिर्दिष्ट तत्वाला २६ जानेवारी १९५० पासून हरताळ फासणार की पूर्व परंपरागत कार्य पुढे चालू ठेवणार आहोत? परस्परविरुध्द अशा प्रकारांनी भरलेले हे आपले आयुष्य आणखी किती दिवस यापुढे चालू ठेवणार? सामाजिक व आर्थिक बाबतीत समता प्रस्थापित करण्याची टाळाटाळ आपण आणखी किती काळ करणार आहोत ! ही टाळाटाळ आपण जर पुष्कळ काळ चालू ठेवली तर आपल्या राजकीय लोकशाहीचे जीवित धोक्यात ठेवूनच ही टाळाटाळ आपणाला टिकविता येईल. ही परस्परभिन्नतादर्शक परिस्थिती शक्य तो लवकर आपण नष्ट केली पाहिजे. नाहीतर या परिस्थितीबद्दल मनात धुसफुसत असलेले लोक या घटनासमितीने प्रचंड परिश्रम घेऊन जी ही शासकीय लोकशाही निर्माण केलेली आहे, तिचे तळपट आकाशात भिरकावून देतील.